# मोटार अपघात दावा अर्ज क्र.२४/२०१७ मधील नि.६ खालील

## आदेश

१. अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.०५/०५/२०१५ रोजी सकाळी ०९.३० वाजताचे सुमारास पुणे ते बेंगलोर महामार्गावर वाढे, ता. जि. सातारा गांवचे हद्दीत अर्जदार क्र.१ हिचे पती सुरेश खाशाबा जाधव हे सामनेवाला क्र.२ यांच्या मालकीच्या महिंद्रा बोलेरो जीप क्र.एम.एच./११/ए.डब्ल्यू–५७१५ मधुन पुणे बाजुकडून सातारा बाजुकडे प्रवास करीत असताना, सामनेवाला क्र.१ ने ती निष्काळजीपणे व भरधाव चालवुन अचानक ब्रेक मारल्याने जीप रस्त्याकडेचे भरावावरुन खाली जावुन झाडास धडकली आणि त्या अपघातामध्ये सुरेश जाधव हे गंभिररित्या जखमी होवून जागेवरच मयत झाले. अपघाताचे वेळी सदरची जीप सामनेवाला क्र.२ यांच्या मालकीची होती आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.३ युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने सर्व सामनेवाला नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे.

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी म्हणणे दिलेले नाही. सामनेवाला क्र.३ यांनी नि.१९ प्रमाणे म्हणणे दिलेले आहे.

४. अर्जदारांनी यादी नि.४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे सातारा तालुका पोलीस स्टेशन मधील दि.०६/०५/२०१५ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.११३/२०१५ मधील प्रथम वर्दी अहवाल व घटनास्थळ पंचनामा यावरुन अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहन त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, महिंद्रा बोलेरो जीप क्र.एम.एच./११/ए.डब्ल्यू–५७१५ चा सामनेवाला क्र.३ यांचेकडे

सामनेवाले क्र.२ यांनी मालक या नात्याने दि.२५/१०/२०१४ ते २४/१०/२०१५ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.३ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेले शव विच्छेदन अहवाल व प्रेताचा पंचनामा यावरुन असे स्पष्ट होते की, सुरेश खाशाबा जाधव यांचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला क्र.२ व ३ सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.२ व ३ यांनी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदार क्र.१ हिस रु.३५,०००/- (रु.पस्तीस हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी रक्कम रु.५,०००/- (रु. पाच हजार फक्त) प्रमाणे रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावेत. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासुन संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवालाक्र.२ व ३ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः२७/०६/२०१७

(बी.यू. देबडवार)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.